# विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर

## ग्रंथालय विभाग

वांग्मय मंडळआयोजित

युवासाहित्य संमेलना निमित्त ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ-दिंडी समारोह.

वार – गुरुवार

दिनांक – 12/05/2022

वेळ – सकाळी 10.00 वाजता

COLLEGE ... VIVEKANAND

Dr. Prabhavati A. Patil
Co-ordinator, Literary
Association, Vivekanand
College, (Autonomous)
Date : 10/05/2022

To
The Principal,
Vivekanand College,
Kolhapur (Autonomous)

Sub : Permission for Book-Exhibition and Book-Rally (Granth Dindi) on 12th May 2022.

Respected Sir,

On occasion of National Intercollegiate Youth Literary Festival, I request you to give us permission for Book Exhibition and Granth Dindi in association with Library section.

Please give us permission & oblige.

Thanking you.

Yours faithfully
[signature]
(Dr Patil P. A.)

Allowed
[signature]
10/5/2022.

VIVEKANAND COLLEGE • KOLHAPUR

REDMI NOTE 7 PRO
2022/5/19 11:34

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## सूचना

N.B.No.: /2022-23 दिनांक: 06.05.2022

ज्युनियर, सिनियर कॉलेजच्या सर्व प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना सूचित करणेत येते की, महाविद्यालयातील वाङ्मय मंडळातर्फे दुसरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन गुरुवार दिनांक 12.05.2022 रोजी संपन्न होत आहे. त्यानिमित्त सकाळी 10.00 वाजता ग्रंथालय हॉलमध्ये पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन केले असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा. साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने होईल. तरी सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पारंपारिक वेशभूषेमध्ये ग्रंथदिंडीमध्ये सामील व्हावे.

BSc-III (Phy) B.SC II (Zoology)
BSC I English
A&C
B.Sc. I B English
B.Sc. III (Microbiology)
B Sc. III (Botany)
B.Sc. III Maths

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर



Granth Dindi





Jr. College Recog. No. H.S.C./1074/R-1/DT : 8-8-1976
Jr. College Code No. 23-09-002

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd. : June 1964



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

२१३०, ई ताराबाई पार्क, कोल्हापूर, जि. कोल्हापूर - ४१६ ००३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नीत

नॅक मानांकन : "A" (सी.जी.पी.ए. ३.२४)
कॉलेज उईथ पोटेन्शिअल फॉर एक्सलन्स, यु.जी.सी., न्यु दिल्ली
स्टार कॉलेज - डी.बी.टी. - भारत सरकार
आय.एस.ओ. ९००१:२०१५

कोल्हापूर (स्वायत्त)

Ph. : 0231-2658612, 2658840 Fax : 0231-2658840 Resi.: 0231-2653962 Website : www.vivekanandcollege.org E-mail : info@vivekanandcollege.org

ापक बापूजी साळुंखे D. Lit.
अध्यक्ष मा. आमदार. चंद्रकांत दादा पाटील
कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे M.A.
सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे M.Sc., B.Ed.
प्राचार्य डॉ. ... M.A., M.Ed., P.G.D.T.E., M.Phil., Ph.D.

क क्रमांक व्हि.सी.कॅ/ 322/2022-23

दिनांक : 14/5/2022

प्रति,

मा. व्यवस्थापक,

हनुमान सेवा मंडळ,

श्री विठ्ठल मंदिर,

बुरूड गल्ली, कोल्हापूर.

विषय ः आभारावावत...

महोदय,

आमच्या महाविद्यालयात गुरूवार दिनांक. **12.05.2022** रोजी दुसरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य सम्मेलन आयोजित केले होते , त्यानिमित्ताने ग्रंथदिंडीचे आयोजन केले होते. सदर साहित्य सम्मेलनासाठी आपल्या मंदिराकडून ग्रंथदिंडीसाठी पालखी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही महाविद्यालयातर्फे आपले आभारी आहोत. तसेच यापुढे असेच सहकार्य मिळावे ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य,
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर.

# शैक्षणिक प्रक्रियेतून मातृभाषेचा विकास

## वामन पंडित; 'विवेकानंद'मध्ये दुसरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शैक्षणिक प्रक्रियेत मातृभाषा विकसित होते, असे मत ज्येष्ठ कवी वामन पंडित यांनी आज येथे व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळातर्फे आयोजित दुसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी झाडांच्या कवितांचे वाचन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते. बापूजी साळुंखे सभागृहात संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

पंडित म्हणाले, 'विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जन व सृजनशीलतेला वाव मिळतो. नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचावे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.'

साळुंखे म्हणाले, 'साहित्य माणसाला जगण्याचे भान देते. मराठी साहित्याला संत साहित्याची परंपरा लाभली आहे. याचबरोबर पंडिती आणि शाहिरी काव्याने मराठी साहित्याला समृद्ध केले. ज्ञानदेवांपासून ते समकालीन साहित्याचा विचार करणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून ज्ञानात भर घातली पाहिजे.'



कोल्हापूर : दुसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना ज्येष्ठ कवी वामन पंडित. शेजारी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, समन्वयक डॉ. प्रभा पाटील.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, 'महाविद्यालयीन युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्याचा आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संमेलनातून केला आहे.'

लेखिका डॉ. सुनीता बोर्डे यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. त्यांनी साहित्य प्रवासाची व कादंबरीच्या जन्माची कथा सांगितली. डॉ. कविता तिवडे यांनी त्यांचा परिचय करून दिला. कवी डॉ. जयप्रभू कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली युवा कविसंमेलन झाले. यावेळी त्यांनी कविता सादर केल्या. डॉ. स्वप्नील बुचडे यांनी त्यांचा परिचय करून दिला. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ युवक महोत्सव विजेत्या संघातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी तेजस गुरव होते.

संमेलनाचा प्रारंभ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसरातून ग्रंथदिंडीने झाला. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.

आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. दीपक तुपे, डॉ. वाय. डी. हरताळे, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी, संदीप पाटील, डॉ. सलमा मणेर, प्रा. माधुरी पवार, प्रा. नम्रता ढाळे यांच्यासह गोवा, कर्नाटक व महाराष्ट्रातील विद्यार्थी उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रभा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.